Prerna Education Society,

# ShreePandharinath Art's & Commerce College,

## Narkhed. Dist.-Nagpur

# Department of Economics

## Annual Report

**अर्थशास्त्र विभाग**

**(सत्र: 2021-22)**

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे महाविद्यालयाचे सत्र व वेळापत्रक यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला असल्यामुळे तसेच महाविद्यालय उशिरा सुरु करण्यात आली होती त्याचा परिणाम स्वरुप



महाविद्यालयातील वर्ग मोठ्या प्रमाणात आभासी स्वरूपात घेण्यात आले. त्यामुळे महाविद्यालयातील कार्यक्रमावर त्याचा प्रभाव पडला. त्यामुळे श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय अंतर्गत अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक- 06/01/22 ला अर्थशास्त्र विभागात अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन व अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना उशिरा करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत जंवजाळ सर हे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक प्रा. सुधाकर पवार सरांनी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करुन अर्थशास्त्राचे आर्थिक जीवनात महत्त्वाचे स्थान काय आहे? यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थी जीवन जगत असताना विद्यार्थ्याला आर्थिक गोष्टीचे महत्त्व समजून घेणे सगळ्यात महत्त्वाचे असते. ज्याने आर्थिकतेचा अभ्यास केला तो जीवनात केव्हाच मागे येणार नाही असे त्यांनी समजून सांगितले. याचा विद्यार्थ्याला नक्कीच फायदा होईल.

तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जयंत जवंजाळ सरानी मार्गदर्शन करीत असताना विद्यार्थ्यांनी जीवन जगत असताना आर्थिकतेचे महत्व आणि आपल्या जीवनामध्ये होणारे बदल याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थीना बचत व गुंतवणुकीचे महत्त्व समजावून सांगितले. श्रीमंत होण्याचे स्वप्न तर प्रत्येक व्यक्तीच बघत असतात परंतु श्रीमंत बनण्यासाठी कोणत्या वर्तणुकी आवश्यकता आहे हेही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.



या कार्यक्रमांतर्गत अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांचे सेमिनार आयोजित करण्यात आलेले होते. यामध्ये महाविद्यालयातील 30 विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सहभाग दर्शविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवी सोरते यांनी केले. यांनी आपल्या प्रास्ताविकेतून विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना आर्थिक साक्षरता कशी महत्त्वाची आहे व त्यामुळे गुंतवणुकीतील

धोके आपण कसे टाळू शकतो हे पटवून दिल. तसेच वर्तमान काळामध्ये शेअर मार्केट, म्युच्युअल फंड व एसआयपी यातील गुंतवणूक भविष्यासाठी फायदेशीर ठरु शकते असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभागाची विद्यार्थिनी कु. सृष्टी शिरसागर हिने केले. तर आभार प्रदर्शन प्रा. अशोक मदनकर यांनी केले. वाणिज्य विभाग व अर्थशास्त्र विभागातील संपूर्ण विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.

विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून तीन महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ( श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय, नरखेड व नगरपरिषद शिवाजी महाविद्यालय मोवाड आणि बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा) BA-3 च्या विद्यार्थ्यांचे Lecture Series चे आयोजन 24 फेब्रुवारी ते 05 मार्च, 2022 दरम्यान 11.30 ते 12.30 या वेळेत करण्यात आले. या आयोजनाचा फायदा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना झाला व त्यांच्या गुणवत्तेत वाढ झालेली दिसून आली. यामध्ये महाविद्यालयातील BA-3 च्या सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला.




